**ठळक बातम्या**

- विधानपरिषद उपसभापतीपदासाठी सचिन अहिर यांचा महायुतीच्या पाठिंब्यावर अर्ज दाखल/ महाविकास आघाडीकडून शिक्षण तज्ज्ञ जगन्नाथ अभ्यंकरांचा अर्ज दाखल

- अनुसूचित जातींच्या उपवर्गीकरणाबाबत बदर समितीच्या अहवालावर सूचना, हरकती विचारात घेऊनच व्यापक चर्चेअंती अंतिम निर्णय घेण्याचं मुख्यमंत्र्यांचं विधानसभेत आश्वासन

- मतदार याद्यांच्या विशेष सखोल पुनरिक्षण प्रक्रियेला आजपासून प्रारंभ

- देशातल्या अपघातप्रवण स्थळांची  दुरुस्ती ५० हजार कोटी रुपये खर्च करून करण्यात येणार

**आणि**

- मोसमी पावसाचं आगमन लांबणीवर पडल्यामुळे देशभर खरीपाच्या पेरण्यांत घट

**<><><><><><>**

विधानपरिषदेच्या उपसभापतीपदाच्या निवडणुकीसाठी सचिन अहिर यांनी आज उमेदवारी अर्ज दाखल केला. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि सुनेत्रा पवार, नीलम गोऱ्हे, चंद्रकांत पाटील, संजय राठोड, संजय शिरसाट आदी नेते यावेळी उपस्थित होते. अहिर हे शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे आमदार आहेत, मात्र त्यांना महायुतीने निवडणुकीसाठी पाठिंबा दिला आहे. विधानपरिषदेचे सभापती, उपसभापती आणि विधानसभा अध्यक्ष आणि उपाध्यक्ष यांना पक्षांतर बंदी कायदा लागू होत नाही, असं राजकीय विश्लेषकांनी सांगितलं.  दरम्यान अहिर यांनी पक्षाच्या सदस्यत्वाचा आणि इतर पदांचा राजीनामा दिल्याचं वृत्त आहे.

सचिन अहिर हे प्रकल्पग्रस्त, कामगार अशा समाजातल्या अनेक घटकांसाठी काम करत असतात, त्यांना उपसभापतीपदाची जबाबदारी दिल्यामुळे शिवसेनेला आणि सभागृहाला याचा फायदा होईल अशी प्रतिक्रिया विधानपरिषदेच्या माजी उपसभापती नीलम गोऱ्हे यांनी बातमीदारांशी बोलताना दिली.

विधानपरिषदेच्या उपसभापती पदाची निवडणूक उद्या होणार आहे. विधानपरिषदेच्या उपसभापती पदासाठी महाविकास आघाडीकडून शिक्षणतज्ज्ञ जगन्नाथ अभ्यंकर यांनी अर्ज दाखल केला. या अर्जांची आता छाननी होत असून, त्यानंतर आवश्यकता भासल्यास उपसभापतीपदासाठी निवडणूक होईल.

दरम्यान, सदनात आपली संख्या कमी असली तरी लोकशाही प्रक्रियेत भाग घेणं, ही विरोधी पक्ष म्हणून जबाबदारी असल्यामुळे या निवडणुकीत उतरत असल्याचं शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे आमदार अंबादास दानवे यांनी सांगितलं. आमदार आदित्य ठाकरे यांनी यावर प्रतिक्रीया दिली…

**होल्ड - बाईट- आदित्य ठाकरे**

**<><><><><><>**

**अनुसूचित** जातींच्या उपवर्गीकरणाबाबत बदर समितीच्या अहवालावर सूचना, हरकती विचारात घेऊनच व्यापक चर्चेअंती अंतिम निर्णय घेऊ, अशी ग्वाही मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी आज विधानसभेत दिली. यात कोणावरही अन्याय होणार नाही, असं ते म्हणाले. उपवर्गीकरणाला विरोध नोंदवत या विषयावर बोलू देण्याची मागणी विरोधकांनी केली. अध्यक्षांनी त्यांना जागेवर बसायची सूचना केली, मात्र विरोधकांनी बोलू देण्याची मागणी लावून धरली आणि ती मान्य न झाल्याने सभात्याग केला.

**जालना** जिल्ह्यात अल्पवयीन मुलांकडून गुन्हेगारी कृत्यं करवून घेतली जात असल्याच्या संदर्भात संबंधित गुन्ह्यासाठीच्या शिक्षेत वाढ करण्यात येईल आणि अशा प्रकरणांमध्ये गुन्हेगारी टोळ्यांचा हात आढळल्यास त्यांच्यावर मकोका लावता

येईल, अशी दुरुस्ती कायद्यात करण्याचं आश्वासन मुख्यमंत्र्यांनी विधानसभेत प्रश्नोत्तराच्या तासात सांगितलं. अशा गुन्ह्यांचं मानसशास्त्रीय विश्लेषण करण्याची गरज सुधीर मुनगंटीवार यांनी अधोरेखित केली, त्याचा अभ्यास करण्यासाठी एक उच्चस्तरीय समिती स्थापन केली जाईल, असं आश्वासन त्यांनी दिलं.

**सन** २०२३ ते मे २०२६ या कालावधीत राज्यात स्वयंसेवी संस्थांच्या माध्यमातून महिलांचं शोषण, लैंगिक छळाच्या एकंदर ४ घटना, तर सक्तीच्या धर्मांतराची १ घटना घडल्याची माहिती मुख्यमंत्र्यांनी दिली. नागपूरमध्ये एका स्वयंसेवी संस्थेच्या संचालकाने तिथं काम करणाऱ्या तरुणींशी अश्लील वर्तन, लैंगिक छळ प्रकरणी उपस्थित केलेल्या प्रश्नावर ते बोलत होते. या प्रकरणातल्या आरोपींनी संस्थेत केलेले काही नियम धर्मस्वातंत्र्यावर घाला घालणारे आहेत, मात्र पीडितेवर किंवा तिच्या कुटुंबियांवर धर्मांतरासाठी दबाव आणल्याचं निष्पन्न झालेलं नाही, अशी माहिती त्यांनी दिली.

**राज्यात** अनेक जण परफॉर्मन्स परवाना घेऊन डान्सबार चालवत आहेत, मात्र डान्सबारच्या कायद्यानुसारच हे परवाने घ्यावे लागतील, अशी दुरुस्ती महाराष्ट्र पोलीस कायद्यात करु अशी घोषणा मुख्यमंत्र्यांनी सभागृहात केली.

**<><><><><><>**

राज्यात मतदार याद्यांच्या विशेष सखोल पुनरिक्षण प्रक्रियेला आजपासून सुरूवात झाली. याअंतर्गत येत्या २९ जुलै पर्यंत बूथस्तरीय अधिकारी घरोघरी प्रत्यक्ष भेट देऊन गणना अर्ज वाटप करतील आणि भरलेले अर्ज परत घेतील. त्यानंतर येत्या पाच ऑगस्ट रोजी प्रारुप मतदार याद्या प्रसिद्ध केल्या जातील. त्यानंतर चार सप्टेंबर पर्यंत प्रारुप यादीवर दावे आणि हरकती नोंदवता येतील, आणि सात ऑक्टोबर रोजी अंतिम मतदार याद्या प्रसिद्ध केल्या जातील. या प्रक्रियेसाठी राज्यात एक लाखाहून अधिक बीएलओ नियुक्त करण्यात आले आहेत.

**<><><><><><>**

केंद्र सरकारने देशातल्या अपघातप्रवण स्थळं आणि दरडी कोसळण्याचा धोका असलेल्या स्थळांची नोंद केली असून ५० हजार कोटी रुपये खर्च करून त्यांची दुरूस्ती करण्यात येणार असल्याचं केंद्रीय रस्ते आणि वाहतूक मंत्री नितीन गडकरी यांनी सांगितलं. ते नवी दिल्लीत रस्ते सुरक्षा या विषय़ावरल्या कार्यक्रमात आज बोलत होते. महामार्गावर दिशादर्शक फलकं, लेन मार्किंग, भुयारी मार्ग तयार करण्यासाठी प्रयत्न केले जातील असं ते म्हणाले. चालकांनी वाहतुकीच्या नियमांचं पालन करावं, गाडी चालवताना मोबाईल वापरणं टाळावं असं आवाहन गडकरी यांनी केलं.

<><><><><><>

मान्सूनच्या पावसाचं आगमन लांबणीवर पडल्यामुळे देशात यंदा खऱीप पिकाची पेरणी कमी प्रमाणात झाल्याचं कृषी मंत्रालयाने म्हटलं आहे. जून महिन्यात १८२ लाख हेक्टर क्षेत्रावर पेरणी झाली आहे, गेल्यावर्षी याच काळात २३६ लाख हेक्टर क्षेत्रावर पेरणी झाली होती, त्यामुळे गेल्यावर्षीच्या तुलनेत यावर्षी पेरणीत २३ टक्के घट झाली आहे. भात, तेलबिया, भरड धान्य, कडधान्य, कापूस या सर्व पिकांवर पाऊस उशीरा आल्यामुळे परिणाम झाल्याचं कृषी मंत्रालयाने सांगितलं.
भात पेरणीत २५ टक्क्यापेक्षा जास्त घट झाली आहे, कडधान्यात ३० टक्के, तेलबिया ५० टक्के तर कापूस लागवडीत ३४ टक्के घट झाली आहे.
दुसरीकडे उसाच्या लागवडीत ५७ टक्के वाढ झाल्याचं कृषी मंत्रालयाने सांगितलं.

<><><><><><>

टीईटी पेपरफुटी प्रकरणात ठाणे पोलिसांनी मुख्य आरोपी बिजेंद्रकुमार गुप्ता याची पत्नी सुमनकुमारी हिला बिहारच्या पटणा शेरपूर इथून अटक केली आहे. या परीक्षेच्या प्रश्नपत्रिका आग्र्यात छापल्या गेल्या, त्या बिजेंद्रकुमार गुप्ता आणि त्याच्या साथीदारांनी आधी दिल्ली आणि त्यानंतर भिवंडीत आणल्या, आणि तिथे त्यांना

पकडण्यात आलं. आग्र्यामधून आरोपींना प्रश्नपत्रिका मिळवून देणारे चार अन्य आरोपी फरार असून, ठाणे पोलीस त्यांचा शोध घेत आहेत.

दरम्यान या प्रकरणी शिक्षणमंत्री दादा भुसे यांनी राजीनामा द्यावा अशी मागणी करत एनएसयुआय या काँग्रेसप्रणित विद्यार्थी संघटनेनं आज विधानभवन परिसरात निदर्शनं केली. निदर्शकांनी दादा भुसे यांना काळे झेंडे दाखवले. पोलिसांनी आंदोलन करणाऱ्या कार्यकर्त्यांना ताब्यात घेतलं.

<><><><><>

गडचिरोलीत पोलीस आणि सीआरपीएफच्या संयुक्त कारवाईत महाराष्ट्र-छत्तीसगड सीमेवरच्या बालबेडा जंगल परिसरात माओवाद्यांनी लपवून ठेवलेले शस्त्रनिर्मितीचे साहित्य शोधून जागीच नष्ट करण्यात आलं.

सुमारे ५ ते ६ टन वजनाचे १ लेथ मशीन, १५० क्लेमोर आणि बीजीएल पाईप्स, २२० नग १२-बोअर पाईप्स, २०रायफल रॉड मेटल पट्ट्या याचा त्यात समावेश होता.

<><><><><>

राज्यात पुढच्या काही दिवसांत पावसाचा जोर वाढणार असल्याचा अंदाज भारतीय हवामान विभागाने वर्तवला आहे. गेल्या २४ तासांत मान्सून पुन्हा सक्रीय झाला असून कोकण, विदर्भ आणि मराठवाड्यात पावसाची नोंद झाली. बीड, अहिल्यानगर, जळगाव आणि लातूर या जिल्ह्यांना पुढच्या चार दिवसांसाठी 'यलो अलर्ट' दिला आहे. तसेच २ आणि ३ जुलै रोजी विदर्भ आणि मराठवाड्याच्या काही भागांत विजांच्या कडकडाटासह मुसळधार पावसाचा इशारा देण्यात आला आहे. मुंबईसह कोकणात तुरळक ठिकाणी ३ जुलैपर्यंत जोरदार ते अतिजोरदार पाऊस पडेल असा अंदाज भारतीय हवामान विभागानं व्यक्त केला आहे.

//<><><><><>//